क्रमांक : १८५७६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर.
दिनांक : ५ नोव्हेंबर, २०२६

:: कार्यालयीन आदेश ::

श्रीमती रूपाली विनय गायकवाड यांची या सचिवालयातील **"दूरध्वनीचालक"** (वेतनस्तर एस-७ : २१७००-६९१००) (अधिक नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यांसह) पदावर **अनुकंपा तत्त्वावर** गुरूवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०२६ रोजीपासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे :-

१) श्रीमती गायकवाड यांची "दूरध्वनीचालक" पदावरील अनुकंपा तत्वावरील नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे.

२) श्रीमती गायकवाड यांची "दूरध्वनीचालक" पदावरील नियुक्ती या सचिवालयाचे दूरध्वनीचालक पदावरील सेवाप्रवेश नियम, २०१३ मधील अर्हता व पात्रता विचारात घेऊन करण्यात येत आहे.

३) सदर नियुक्ती श्रीमती गायकवाड यांच्या वैद्यकीय पात्रतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४) श्रीमती गायकवाड ह्या आरक्षित प्रवर्गातील असल्यास त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

५) सदर नियुक्ती तात्पुरती असून, सदर नियुक्ती त्यांचे पुर्वचारित्र्य, वर्तणूक अहवाल इ.वर अवलंबून राहील.

६) श्रीमती गायकवाड यांचा 'दूरध्वनीचालक' पदावरील परिविक्षाधीन कालावधी दोन वर्षांचा राहील.

७) श्रीमती गायकवाड यांनी रुजू होतेवेळी महाराष्ट्र राज्याच्या रहिवाशी (Domicile Certificate) असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

..२/-

८) श्रीमती गायकवाड यांनी रुजू होतेवेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७ जुलै, २०२५ अन्वये 'परिशिष्ट' मध्ये नमूद केलेली माहिती सादर करणे आवश्यक राहील.

९) श्रीमती गायकवाड यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ च्या नियम ४ नुसार विहीत 'नमुना-अ' मधील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०) वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक अंनियो/२०१५/(NPS) प्र.क्र.३२/सेवा-४ दिनांक ६ एप्रिल, २०१५ मधील तरतूदी नुसार (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू राहील.

११) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त सर्वसाधारणपणे शासनाने विहित केलेल्या इतरही सेवाविषयक नियम लागू असतील व त्या **नियमांचे पालन करणे** बंधनकारक राहील.

१२) श्रीमती गायकवाड यांनी दूरध्वनीचालक पदावरील नियुक्तीकरीता आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे तपासणी/ पडताळणी करुन घेण्यासाठी सदरहू आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत मूळ प्रमाणपत्र 'क-१' (आस्थापना) कक्षात सादर करावीत.

१३) श्रीमती गायकवाड यांची 'दूरध्वनीचालक' पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्यानंतर त्यांना या सचिवालयाच्या अन्य कोणत्याही संवर्गात नियुक्ती व पदोन्नतीच्या अनुषंगाने भविष्यात मागणी अथवा दावा करता येणार नाही.

सदरहू पदावर रुजू होण्यासाठी श्रीमती रूपाली विनय गायकवाड यांना कोणताही प्रवास भत्ता देण्यात येणार नाही. तसेच त्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांना सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे झाल्यास त्यांना कार्यालयास तीस दिवसांची पूर्व सूचना द्यावी लागेल अथवा त्याऐवजी एक महिन्याचे वेतन कार्यालयास परत करावे लागेल.

श्रीमती गायकवाड यांनी आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांत कार्यालयीन वेळेत हजर होऊन त्याप्रमाणे निम्न स्वाक्षरीत अधिकारी यांना कळवावे.

आदेशानुसार,

(घ.ज्ञा.देबडवार)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

श्रीमती रूपाली विनय गायकवाड

बी-७, नव दिग्विजय पंकज बिल्डींग,

एक्सर रोड, बोरीवली (प.), मुंबई ४०० ०९२

भ्रमणध्वनी क्र. :- ९९२०१४७९७९

प्रतिलिपी :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

४) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

८) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

९) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१०) वैयक्तिक नस्ती

११) निवडनस्ती